# महाराष्ट्र राज्य बालनाट्य व दिव्यांग बालनाटय स्पर्धा
## ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रवेशिका उपलब्ध

---

**मुंबई, दि. ४ ऑगस्ट** : शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने डिसेंबर, २०२५ पासून सुरु होणाऱ्या बालनाट्य स्पर्धासाठी हौशी नाट्य संस्था/शाळा/विद्यालयांकडून दिनांक ४ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक श्री. बिभीषण चवरे यांनी दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बालनाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे श्री. चवरे यांनी नमूद केले आहे.

२२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर, २०२५ पासून १० केंद्रांवर आयोजित करण्यात येणार असून दिव्यांग बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी माहे जानेवारी, २०२५ पासून आयाजित करण्यात येणार आहे.

नोंदणीकृत हौशी नाट्य संस्था/शाळा/विद्यालयांकडून तसेच गतवर्षी बालनाटय स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या https://mahanatyaspardha.com या वेबसाईटवर **ऑनलाईन** उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका दि. ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात.

विहित मुदतीनंतर प्रवेशिका कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशिल भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही.

स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरीता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल.

राज्यातील जास्तीत जास्त संस्था/शाळा/विद्यालयांनी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक श्री. बिभीषण चवरे यांनी केले आहे.

---

# २२ वी महाराष्ट्र राज्य बालनाटय स्पर्धा

## ७ वी महाराष्ट्र राज्य दिव्यांग बालनाटय स्पर्धा

## २०२५-२०२६

### नियम

महाराष्ट्र राज्य बालनाटय व दिव्यांग बालनाटय महोत्सवांतर्गत बालनाटयस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या बालनाटय संस्थांचे अर्ज खालील नियम व अटी पूर्ण करीत असतील तरच विचारात घेण्यात येतील.

### पात्रता

१. **(अ)** संस्था नोंदणीकृत असून कमीत कमी दोन वर्षे अस्तित्वात असली पाहिजे. तथापि संस्थेचे कार्य सृजनशील असून बालरंगभूमीस पोषक असल्यास हा कालावधी शिथिल करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना असतील.

**(आ)** प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय यांना प्रवेश अर्ज करता येईल. अर्जदार संस्थेस शक्यतो जिल्हा पातळीवर किमान एक पारितोषिक मिळाले असले पाहिजे.

**(इ)** कमीत कमी पाच स्वीकारपात्र प्रवेशिका आल्याखेरीज स्पर्धेचे आयोजन केले जाणार नाही.

### प्रवेशिका

**२.(अ)** बालनाटय स्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थेला/शाळा/विद्यालय यांना विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

**(आ)** प्रत्येक संस्थेस/शाळा/विद्यालय जास्तीत जास्त एका बालनाटय स्पर्धेत उतरता येईल.

**(इ)** स्पर्धक संस्थांनी/शाळांनी/विद्यालयांनी योजिलेल्या नाटकाच्या संहितेची एक सुवाच्च्य प्रत प्रवेशिकेसोबत पाठवावी लागेल. प्रत सुवाच्च्य नसल्यास, प्रवेशिका स्विकारली जाणार नाही.

**(ई)** प्रवेश अर्ज भरतेवेळी स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाचा प्रयोग पूर्वी झाला असण्याची आवश्यकता नाही. नाटकाचा पहिला प्रयोगसुध्दा स्पर्धेत सादर करता येईल.

**(उ)** संस्थेला/शाळेला/विद्यालयाला त्यांनी योजिलेल्या नाटकाच्या बाबतीत रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र पाठवावे लागेल. असे प्रमाणपत्र प्रवेशिकेसोबत सादर केलेले नसेल तर प्रवेशिका स्विकारण्यात येणार नाही.

**(ऊ)** प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रात संस्थेने आपल्या नाटकात काम करणाऱ्या सर्व कलाकारांची संपूर्ण व बरोबर नावे, वय आणि ते करीत असलेल्या भूमिकांच्या निर्देशासहित पाठवावी लागतील. नाटकाच्या दिग्दर्शनाची तसेच नेपथ्य, ध्वनी व प्रकाश योजना, पार्श्वसंगीत, वेशभूषा, लेखन, रंगभूषा इत्यादीची जबाबदारी उचलणाऱ्या व्यक्तिंचीही नावे पाठवावी लागतील. नंतर त्यात काही बदल झाल्यास सुधारित नावे स्पर्धा सुरु होण्यापूर्वी तीन आठवडे अगोदर पाठवावी लागतील.

**(ए)** संस्थेला त्यांनी योजिलेल्या नाटकाचे स्वरुप विशेषत: ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरित आहे किंवा दुसऱ्या नाटकाचे रुपांतर आहे हे त्या मूळ नाटकाचे लेखक, त्या मूळ नाटकाची भाषा यांचा निर्देश इत्यादी बाबी कळवाव्या लागतील. नाटक, कथा, कादंबरी इत्यादी किंवा अन्य वाङ्‌मय प्रकारावर आधारित असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल. संस्थेला/शाळेला/विद्यालयाला त्यांनी योजिलेले नाटक नवीन असल्यास व ते बालनाटय महोत्सवाकरिता खास लिहिलेले असल्यास तसा स्पष्ट उल्लेख करावा लागेल.

**(ऐ)** बालनाटय स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाच्या लेखकाचे अनुमतीपत्र प्रवेशिकेसोबत जोडणे आवश्यक आहे. नाटक भाषांतरित अथवा आधारित असल्यास मूळ लेखकाचेही अनुमतीपत्र प्रवेशिकेसोबत जोडावे लागेल.

**(ओ)** स्पर्धेत संस्थेला अनामत रक्कम म्हणून रुपये १,०००/- ऑनलाईन स्वरुपात अर्जासोबत भरावे लागतील.
ज्या स्पर्धक संस्था/शाळा/ विद्यालय पूर्ण बालनाटय प्रयोग सादर करतील त्यांना प्रवेशिकेसोबत अनामत रक्कम म्हणून रुपये १,०००/- परत पाठविण्यात येईल.
ज्या संस्था/शाळा/विद्यालय ऐनवेळी प्रयोग रद्द करतील त्यांच्या अनामत रकमा शासकीय कोषागारात जमा करण्यात येतील.

**(औ)** पूर्ण बालनाटय प्रयोग करणाऱ्या स्पर्धक संस्थेस नेपथ्य, ध्वनी व प्रकाश योजना, साहित्याची वाहतूक, हमाली, नाटकाचे आकर्षक सेट्स इत्यादीसाठी नाटय निर्मिती खर्च म्हणून रुपये ६,००० इतकी रक्कम देण्यात येईल.

**(अ:)** बालनाटय स्पर्धेत १५ वर्षांखालील बालकलाकारांसाठी ही स्पर्धा आहे. तसेच दिव्यांग बालनाटय स्पर्धेतील बालकलाकारांसाठी इयत्ता दहावीपर्यंत शिकत असलेले दिव्यांग विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र ठरतील. तथापि, तंत्रज्ञ यांच्याबाबतची वयाची अट शिथील करण्यात येईल.

## बालनाटकाचे स्वरुप, कालमर्यादा

**३.(अ)** स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अंतिम अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना राहील. स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक संचालनालयाने नाकारल्यास त्याची कारणे देण्याचे बंधन राहणार नाही.

**(आ)** संस्थेने/शाळेने/विद्यालयाने योजिलेले बालनाटक पूर्वी बालनाटय स्पर्धेत सादर केलेले असल्यास व ते पूर्वी पारितोषिक पात्र ठरलेले असल्यास तेच बालनाटय त्याच संस्थेला / शाळेला/ विद्यालयाना पुन:सादर करता येणार नाही. मात्र इतर संस्थेला/ शाळांना / विद्यालयाना ते बालनाटय सादर करता येईल.

**(इ) कोणत्याही बालनाट्याची सादरीकरणाची कालमर्यादा कमीत कमी २५ मिनिटे तर जास्तीत जास्त ४५ मिनिटांचे असावे.**

## बालनाटय संस्थांचा प्रवास व इतर खर्च

**४.(अ)** बालनाटय महोत्सवाकरिता सहभागी झालेल्या स्थानिक संस्थेला/शाळेला/विद्यालयांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता देण्यात येणार नाही. परंतु ज्या संस्थाना/शाळांना/विद्यालयांना त्यांच्या नोंदविलेल्या कार्यालयाच्या ठिकाणाहून दुसऱ्या गावी नाटक सादर करण्यास सांगितले गेल्यास त्यांना होणारा जाण्या-येण्याचा प्रवास खर्च देण्यात येईल. तथापि, हा खर्च प्रत्येक संस्थेच्या संघटक, दिग्दर्शक, पार्श्वसूचक, कलाकार, तंत्रज्ञ, इत्यादी २८ कलाकारांच्या मर्यादेत देण्यात येईल. संस्थेने प्रवास केलेल्या रेल्वे/एस.टी. तिकिटांच्या सत्यप्रती देणे आवश्यक राहील.

**(आ)** बालनाटय स्पर्धेत सादर होणाऱ्या नाटकातील भूमिका करणाऱ्या जास्तीत जास्त २० कलाकारांना व ८ तंत्रज्ञांना रेल्वे अथवा एस.टी.चा प्रत्यक्ष प्रवास खर्च व जेवण्या-राहण्याचा दरडोई रु.१५०/- प्रमाणे खर्च देण्यात येईल.

**५.(अ)** प्रवेशिका विहित नमुन्यानुसार संपूर्ण आवश्यक माहिती व कागदपत्रांसहीत देऊन दिलेल्या

मुदतीत पाठविली पाहिजे. दिलेल्या मुदतीत प्रवेशिका पाठविली नाही तर विचारात घेतली जाणार नाही.

**(आ)** बालनाटय महोत्सवाकरिता निवडल्या गेलेल्या संस्थेला/शाळेला/विद्यालयाला आपले बालनाटय दिलेल्या दिवशी, दिलेल्या ठिकाणी व दिलेल्या वेळी सादर करावे लागेल. कुठल्याही कारणास्तव बालनाटय महोत्सवाकरिता निवडले गेलेले नाटक रद्द न करण्याची हमी संस्थेला/ शाळेला/विद्यालयाला द्यावी लागेल. संस्थेने नाटक रद्द केल्यास अनामत रक्कम परत न करता शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

**(इ)** बालनाटय स्पर्धेत प्रथम क्रमाकांची पारितोषिके मिळविणाऱ्या संस्थाना/शाळांना/विद्यालयांना स्पर्धेनंतर शासनाने सांगितल्यास एक किंवा अधिक प्रयोग करावे लागतील.

**(ई)** (१) बालनाटय स्पर्धेच्या अंतिम फेरीत ठराविक एका विभागात सलग तीन किंवा अधिक वेळा प्रथम पारितोषिक मिळविणाऱ्या कलाकारांना किंवा तंत्रज्ञांना सन्माननीय विजेते समजण्यात येईल व त्यांना त्या ठराविक एका विभागाकरिता त्यानंतर पुढील पारितोषिकास अपात्र ठरविण्यात येईल. यात नाटय लेखकांचा समावेश नसेल.

(२) बालनाटय स्पर्धेत सादर होणाऱ्या बालनाटकात काम करणाऱ्या कलाकारांना महाराष्ट्र शासनाच्या याच बालनाटयस्पर्धेतील इतर बालनाटकात काम करता येणार नाही.

(३) संस्थेच्या/शाळेच्या/विद्यालयाच्या प्रवेशिका बालनाटयस्पर्धेसाठी स्विकारण्यात आल्यावर संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्या पूर्वसंमतीशिवाय नाटकात भाग घेणाऱ्या कलाकारांच्या यादीत बदल करता येणार नाही.

(४) बालनाटय संस्थेस/शाळा/विद्यालयास शासनाकडून सुचविण्यात आल्यास, नाटकातील काही भाग किंवा वाक्ये गाळावी लागतील.

(५) अंतिम बालनाटयस्पर्धेत संस्थेला/शाळेला/विद्यालयाला पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या पारितोषिकाकरिता अनुक्रमे कमीत कमी ७०, ६५ किंवा ६० गुण असणे आवश्यक आहे.

(६) संस्थेने/शाळेने/विद्यालयाने सरासरी ४० गुणांपेक्षा कमी गुण सतत दोन वर्ष मिळविल्यास ती संस्था, शाळा, विद्यालय नाटयस्पर्धेत भाग घेण्यास एक वर्षाकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

(७) स्पर्धेच्या पारितोषिकाविषयी शासनाने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

(८) संस्थेने/शाळेने/विद्यालयाने त्यांनी दिलेल्या प्रवेशिकेतील नियम व अटींचे पालन न केल्यास ती संस्था पुढील नाटयस्पर्धेमध्ये भाग घेण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

(९) कुठलेही कारण न देता एखादी प्रवेशिका रद्द करण्याचा अधिकार संचालकांना राहील.

☒☒☒